# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २९/०३/२०२६ (रविवार )

**(Mini Pressnote)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ०५ गुन्हे नोंद
## ०४ वाहनासह ०१ कोटी ३१ लाख ८० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## भिवापुर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन भिवापूर :— भिवापूर पोलीसांनी अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणा—यांवर दिनांक २८/०३/२०२६ आणि दिनांक २९/०३/२०२६ रोजी खालील प्रमाण कारवाई करून ५ गुन्हे नोंदविले

कारवाई क्रं १) :— दिनांक २८/०३/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांनी मौजा नांद फाटा जवळी फाटा येथे नाकाबंदी केली असता टिप्पर क्र. एम एच—४०/बी एल—३४०० मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्परचा चालक नामे निलेश नानाजी देवगडे, वय ३७ वर्ष, रा. लोहारा, ता. उमरेड, जि. नागपूर हा मिळुन आला. मालकाचे नाव विचारले असता संदिप तलमले, वय ३९ वर्ष, रा. उमरेड, जि. नागपूर अशी माहिती प्राप्त झाली. पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन टिप्पर (ट्रक) क्र. एम एच—४०/बी एल—३४०० किंमती २०,००,०००/—रूपये २) ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये असा एकुण २०,३०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

कारवाई क्र. २) दिनांक २९/०३/२०२६ रोजी भिवापूर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना मौजा पोस्टे टी पॉईंट भिवापूर येथे १२ चक्का टिप्पर क्र. एम एच–१४/के ए–७८४५ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्परचा चालक नामे **आदित्य कोठीराम वांढरे, वय २१ वर्ष, रा. निलज, ता. पवनी, जि. भंडारा हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले. वाहन मालकाचे नाव राहुल राऊत, रा. नागपूर** असे असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन १) १२ चक्का टिप्पर क्र. एम एच–१४/के ए–७८४५ किंमती ३०,००,०००/–रूपये २) ०८ ब्रास रेती किंमती ४०,०००/– रूपये असा एकुण ३०,४०,०००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

कारवाई क्र. ३) दिनांक २९/०३/२०२६ रोजी भिवापूर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान मौजा पोस्टे टी पॉईंट येथे टिप्पर क्र एम एच–४०/बी एल–६३४२ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्परचा **चालक नामे रविंद्र नागोराव लिल्हारे, वय ३२ वर्ष, रा. सिहोरा पोस्टे कन्हान ता. पारशिवनी असे सांगितले. वाहन मालकाचे नाव निखील गभणे, रा. खसाळा मसाळा नागपूर** असे असल्याची माहीती प्राप्त झाली. त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन** १) टिप्पर क्र एम एच–४०/बी एल–६३४२ किंमती २०,००,०००/–रूपये आणि वाहनातील ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/–रूपये असा एकुण २०,३०,०००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

कारवाई क्र. ४) दिनांक २९/०३/२०२६ रोजी भिवापूर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान जिचकार सभागृह भिवापूर येथे १२ चक्का टिप्पर क्र. एम एच–४०/सी.टी– ९३११ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्परचा **चालक नामे प्रदयुम विजय ठाकरे, वय २८ वर्ष, रा. कावरापेठ उमरेड असे सांगितले. वाहन मालकाचे नाव युवराज जुनघरे, वय ३१ वर्ष, रा. कावरापेठ उमरेड असे असल्याची माहीती प्राप्त झाली**. त्याला परवान्याबाबत विचारणा केली

असता त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन १)** १२ चक्का टिप्पर क्र. एम एच—४०/सी.टी— ९३११ किंमती ३०,००,०००/—रूपये आणि वाहनातील ०८ ब्रास रेती किंमती ४०,०००/—रूपये असा एकुण ३०,४०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

कारवाई क्र. ५) दिनांक २९/०३/२०२६ रोजी भिवापूर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान तहसिल टी पॉईंट भिवापूर येथे १२ चाकी टिप्पर क्र. एम एच—४०/डी सी—६७८६ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्परचा **चालक नामे बाबुलाल मोहरी कोरोचे, वय २७ वर्ष, रा. खाम धाना जाफल, ता. भसदैही जि. बैतुल मध्यप्रदेश** असे सांगितले. वाहन मालकाचे नाव मनिष एल्लामनचली, रा. रामटेक असे असल्याची माहीती प्राप्त झाली. त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन १)** १२ चाकी टिप्पर क्र. एम एच—४०/डी सी—६७८६ किंमती ३०,००,०००/—रूपये आणि वाहनातील ०८ ब्रास रेती किंमती ४०,०००/—रूपये असा एकुण ३०,४०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**वरील कारवाईत एकुण ३६ ब्रास रेती आणि ५ वाहने असा एकुण १,३१,८०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी चालक व मालक यांच्या विरूध्द पोस्टे भिवापूर येथे कलम ३०३(२), ३(५), ४९ भा.न्या.सं, सहकलम ४८(८), ४८(७) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६ अन्वये ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**



## २.८६७ किलो ग्रॅम गांजा सह ०१ लाख ६७ हजार ८४० रूपयांचा मुद्देमाल जप्त, आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, गांजा पुरवठा करणा—या आरोपीला अवघ्या २ तासात अटक

## नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन सावनेर :— दिनांक २८/०३/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे पथक सावनेर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ गांजा बाबत खात्रीशिर माहीती दिली. नमुद पथकाने सावनेर पोलीसांसोबत संयुक्तरित्या कारवाई करत पेट्रोलींग केली असता पेट्रोलींग दरम्यान नागपुर ते सावनेर रोडने माळेगाव जवळ **आरोपी क्र. १ प्रदिप धरम यादव, वय २४ वर्षे, रा. चनकापुर, झुल्याजवळ ,वलनी रोड खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपुर** हा बजाज पल्सर मोसा क्र. एम एच—४० डी जी— ८२९३ वर जाताना दिसला. आरोपी शासकिय वाहन पाहुन संशयास्पदरित्या पळुन जावु लागल्याने पोलीसांचा संशय बळावल्याने त्याचा पाठलाग करुन नमुद आरोपीचा शिताफिने पाठलाग करून बोरुजवाडा पुला जवळ ताब्यात घेतले. पोलीसांनी पंचासमक्ष त्याची आणि कडील बॅगची झडती घेतली अंमली पदार्थ गांजा मिळुन आला.

**नमुद आरोपीच्या ताब्यातुन अंमली पदार्थ गांजा २.८६७ किलोग्रॅम किंमती ५७,३४०/—रुपये , ०१ मोबाईल व बजाज पल्सर मोसा क्र. एम एच—४०/डी जी—**

८२९३ असा एकुण १,६७,८४०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मिळुन आलेल्या आरोपीला अंमली पदार्थ गांजा पुरवठा करणारा आरोपी नामे रोहीत देशराज सुर्यवंशी, वय २९ वर्षे, रा. चनकापुर खापरखेडा, ह. मु. मॉडर्न कॉलेज जवळ, बोखारा रोड, नागपुर हा असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली. अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यांनी यातील आरोपी क्र. २ याचा तात्काळ शोध घेवुन अवघ्या २ तसात त्याला नागपुर शहर येथुन ताब्यात घेत अटक केली. आरोपी क्र. २ सराईत गुन्हेगार असुन त्यांचेवर अनेक गंभीर गुन्हे नोंद आहे.

नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन सावनेर येथे कलम ८(क), २० (ब) (पप) (ब) ,२२,२९ एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.



# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ०२ गुन्हे नोंद ०२ वाहनासह ९० लाख ६५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन पाचगाव :— पाचगाव पोलीसांनी सतर्क पेट्रोलींग करून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणा—यांवर खालील प्रमाण कारवाई केली.

कारवाई क्र. १) दिनांक २९/०३/२०२६ रोजी पाचगाव पोलीस पेट्रोलींग करीत असतांना उमरेडकडुन नागपूरकडे १२ चक्का ट्रक क्र. एम एच—४०/सी. डी—९०१० मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रकचा चालक नामे **इसराईल रहेमान पठाण, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, भिवापूर** हा मिळुन आला. वाहन चालकाकडे असलेल्या रेती वाहतूकीच्या परवान्यापेक्षा जास्त तसेच क्षमतेपेक्षा जास्त रेती आढळुन आली. वाहन मालकाचे नाव आयुश **अरूण सिंग, वय २५ वर्ष, रा. उमरेड ता. उमरेड** असे असल्याची माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन १) १२ चक्का ट्रक क्र. एम एच—४०/सी. डी—९०१० किंमती ४५,००,०००/—रूपये २) रॉयल्टी व ०६ ब्रास विनारॉयल्टी रेती किंमती ३०,०००/— रूपये असा एकुण ४५,३०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

कारवाई क्र. २) दिनांक २९/०३/२०२६ रोजी पाचगाव पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान मौजा खापरी राजा फाटा ते नागपूर कडील हायवे रोडवर १२ चाकी वाहन क्र. एम एच—४०/सी व्ही—५०५५ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रकचा **चालक नामे सतेंद्र गोविंदराव परते, वय ४२ वर्ष, रा. प्लॉट नं. १३, बजरंग नगर, मानेवाडा रोड नागपूर** असे सांगितले. वाहन मालकाचे नाव  शतायु मानेकर, वय ३० वर्ष, रा. अयोध्या नगर नागपूर असे असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता रेती वाहतूकीच्या परवान्यापेक्षा जास्त तसेच क्षमतेपेक्षा जास्त रेती आढळुन आली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन १) १२ चाकी वाहन क्र. एम एच—४०/सी व्ही—५०५५ किंमती ४५,००,०००/—रूपये आणि वाहनातील ७ ब्रास रेती किंमती ३५,०००/—रूपये असा एकुण ४५,३५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

दोन्ही कारवाईत एकुण १३ ब्रास रेती आणि २ वाहने असा एकुण ९०,६५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोस्टे पाचगाव येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं, सहकलम ४८(८), ४८(७) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अधिनियम अन्वये ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.




## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद वाहनासह ३० लाख ४५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त उमरेड पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन उमरेड:— दिनांक २८/०३/२०२६ रोजी उमरेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, बायपास चौक उमरेड येथे टिप्पर मध्ये अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी बायपास चौक येथे नाकाबंदी केली असता टाटा कंपनीचा बारा

चाकी टिप्पर क्र. एम एच—३४/बि झेड—११०१ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्परचा चालक **नामे गुरूदेव केवलराम झोडे, वय ३६ वर्ष, रा. भुयार जि. भंडारा** हा मिळुन आला. पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन बारा चाकी टिप्पर क्र. एम एच—३४/बि झेड—११०१ किंमती ३०,००,०००/—रूपये २) ०९ ब्रास रेती किंमती ४५०००/— रूपये असा एकुण ३०,४५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी चालक गुरूदेव केवलराम झोडे, वय ३६ वर्ष, रा. भुयार जि. भंडारा याच्या विरूध्द पोस्टे उमरेड येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं, सहकलम ४८(८), ४८(७) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान १९८४, सहकलम १५ पर्यावरण सरक्षण अधिनियम, सह कलम १३०/१७७ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात** आला आहे.



# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २४ गुन्हे नोंद

दिनांक २८/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, साहित्य असा एकुण १३१०१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन भिवापूर येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे एकुण ८ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे एकुण ०३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ०१ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण २४ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत १२५१० मिली देशी दारू, २४००० मिली विदेशी दारू, २४३ लीटर मोहाफुल दारू, २००० लीटर मोहाफुल रसायन सडवा तसेच इतर साहीत्य असा एकुण १३१०१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने